# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स: २२१६३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in
संकेत-स्थळ - www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/माईंडस्पेस/२०१६/** : विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १८१ आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३' ('मुख्य विनियम') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ :**

(१) या विनियमांना 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१६' असे म्हणावे.

(२) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम २.१(एफ) मध्ये सुधारणा :-**

मुख्य विनियमांमधील विनियम २.१ (एफ) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की :-

"एसपीपीएल" म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत दि. २३ डिसेंबर, २००३ रोजी नोंदणी झालेली आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाच्या वाणिज्यिक

विभागाने निर्गमित केलेल्या पत्र क्र. एफ.२/९४/२००६-इपीझेड, दिनांक २३ ऑक्टोबर, २००६ आणि अधिसूचना क्र. एस.ओ.१८७६(इ), दिनांक २ नोव्हेंबर, २००७ अन्वये आयटी/आयटीइएस विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विकासक म्हणून मान्यता दिलेली 'सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड'; आणि तिच्या नावात झालेल्या बदलाच्या परिणामस्वरुप, म्हणजे आणि संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यामध्ये, कंपनी निबंधकांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी निर्गमित केलेले नवीन विधीसंस्थापन प्रमाणपत्र आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाच्या वाणिज्यिक विभागाने दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रायव्हेट लिमिटेडचा, समावेश असेल.

**अश्वनी कुमार सिन्हा**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

मुंबई,
दिनांक : ४ ऑगस्ट, २०१६

सूचनाः महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) यांना ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी)विनियम, २०१३, शासकीय राजपत्रात दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.